मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २३१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्य सज्ज

## उपलब्ध पाण्याचे नियोजन व जलसंधारणाची कामे पूर्ण करण्यावर भर द्यावा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई -** संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारी, प्रभावी अंमलबजावणी आणि समन्वयाच्या माध्यमातून या आपत्तीचे सौम्यीकरण करण्यात यावे. यासाठी सर्व विभागांनी तत्काळ उपाययोजना राबवाव्यात. पाण्याचे सुयोग्य नियोजन, जलसंधारणाच्या कामांना गती आणि जुन्या जलस्त्रोतांची दुरुस्ती व पुनरुज्जीवन यावर भर देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्यातील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली. बैठकीस कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषि, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्यासह कृषी, मदत व पुनर्वसन, वित्त, जलसंपदा, जलसंधारण, भारतीय हवामानशास्त्र विभाग, वित्त व नियोजन विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यंदा ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत एल निनोचा सर्वाधिक परिणाम जाणवण्याची शक्यता असून पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मे महिन्यात उष्णतेची तीव्रता तुलनेने कमी राहील, मात्र उष्णतेच्या लाटा अधिक प्रमाणात येण्याची शक्यता वर्तविण्यात आली. दरम्यान, पॉझिटिव्ह 'आयओडी' विकसित झाल्यास एल निनोच्या परिणामांची तीव्रता काही प्रमाणात कमी होऊ शकते, असेही यावेळी सांगण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, २०१५ मध्ये पावसाळा संपल्यानंतर राज्यातील पाणीसाठा केवळ ४५ टक्के होता, मात्र सध्या पावसाळा सुरू होण्यापूर्वीच तितका साठा उपलब्ध आहे. त्यामुळे योग्य नियोजन केल्यास राज्याला या परिस्थितीचा सक्षमपणे सामना करता येईल. २०१५ मधील एल निनोच्या कालावधीतील अनुभवावरून २०१८ या वर्षी उपाययोजना केल्यामुळे पिके वाचविता आली. एल निनोच्या कालावधीत पावसातील अनियमिततेमुळे विशेषतः मराठवाड्यात मोठा परिणाम दिसून आला होता. दोन पावसाच्या सरींमध्ये दीर्घ खंड पडल्यास पिकांवर ताण येतो, मात्र संरक्षित सिंचनाच्या माध्यमातून पिकांचे नुकसान कमी करता येते. त्यामुळे जलसंधारण व पाणी साठवण क्षमतेत वाढ करणे अत्यावश्यक आहे.

जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार **पान २ वर**

## सिंधी काळेगाव येथे अवकाळी पावसाचा फटका; वीज कोसळून तीन जनावरे दगावली

### आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केली तात्काळ पाहणी



**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील सिंधी काळेगाव येथे काल रात्री झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. असुन शेतकरी सदाशिवराव मुळे (सर्वे नं. ५२३) यांच्या शेतात वीज कोसळून तीन जनावरे दगावल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

घटनेची माहिती मिळताच शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. यावेळी त्यांनी झालेल्या **पान २ वर**

## जालना व बुलढाणा जिल्ह्यात हजारो वृक्षलागवडीचा उपक्रम

### युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडिया व सह्याद्री देवराई फाउंडेशनची संयुक्त मोहीम

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** पर्यावरण संवर्धन आणि हरित भविष्यासाठी युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडिया () व सह्याद्री देवराई फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जालना व बुलढाणा या दोन जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड व बीजारोपण मोहीम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत शाळा परिसर, गायरान जमीन, सार्वजनिक मोकळ्या जागा तसेच ग्रामीण भागांमध्ये हजारो वृक्षांची लागवड करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. लोकांनी आधी पृथ्वीला ओसाड केलं, आता पुन्हा हिरवळ शोधत आहेत. मानवी सातत्य खरंच विलक्षण असतं.

या महत्त्वाकांक्षी उपक्रमाच्या नियोजनासाठी नुकतीच पुणे येथे बैठक पार पडली. या बैठकीत सह्याद्री देवराई फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा अभिनेते सयाजी शिंदे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. पर्यावरण संरक्षण, ग्रामीण विकास, सामाजिक जबाबदारी आणि युवकांच्या सहभागातून मोठी हरित चळवळ उभारण्याबाबत सकारात्मक विचारविनिमय झाला.

यावेळी सयाजी शिंदे यांना १० प्रकारचे फॉरेस्ट सीड्स, एकूण १० किलो भेट स्वरूपात देण्यात आले. या बियांच्या माध्यमातून विविध भागांत बीजारोपण करून नैसर्गिक पद्धतीने मोठ्या प्रमाणावर वृक्षनिर्मिती करण्याचे नियोजन करण्यात आले.

आगामी काळात जालना व बुलढाणा जिल्ह्यांत स्थानिक युवक, स्वयंसेवक, सामाजिक संस्था व ग्रामस्थ यांच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणावर वनराई उभी करण्यात येणार आहे. तसेच जालना जिल्ह्यात नर्सरी उभारण्याचाही मानस व्यक्त करण्यात आला असून, विविध प्रजातींची रोपे तयार करून हरित अभियानाला अधिक गती देण्यात येणार आहे. पर्यावरण रक्षण ही काळाची गरज असून प्रत्येकाने वृक्षसंवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे मत सयाजी शिंदे यांनी व्यक्त केले. त्यांनी या सामाजिक उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडियाचे मॅनेजिंग डायरेक्टर दुर्गेश बनकर यांच्यासह विशाल नवले, अनुराग जाधव व करण दंभेदार हे या मोहिमेसाठी विशेष प्रयत्नशील असून, दोन्ही जिल्ह्यांत हरित परिवर्तन घडविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. काही जण फक्त फोटोसाठी रोप धरतात. इथे निदान ते लावण्याचं तरी बोललं जातं, हीही प्रगतीच.

## मस्तगडमध्ये कचऱ्याचे साम्राज्य; मनपाच्या नाकर्तेपणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात!

### न्यायालयीन वादाचे तुणतुणे वाजवून प्रशासन झोपेत; त्या प्लॉटमुळे डेंग्यू, मलेरियाचा धोका वाढला

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील अतिशय गजबजलेल्या मस्तगड आणि लक्ष्मीनारायणपुरा येथील मोची गल्ली परिसराला सध्या कचराकुंडीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. प्रशासकीय दुर्लक्ष आणि नियोजनाच्या अभावामुळे या भागात घाणीचे साम्राज्य पसरले असून, स्थानिक रहिवाशांच्या आरोग्याचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. वारंवार तक्रारी करूनही महानगरपालिका प्रशासन कोणतीही ठोस कारवाई करत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मोची गल्ली परिसरातील एका मोकळ्या भूखंडावर (प्लॉट) गेल्या अनेक दिवसांपासून कचऱ्याचे ढीग साचले आहेत. या कचऱ्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. स्थानिक नागरिकांनी यासंदर्भात स्वच्छता निरीक्षकांपासून () ते आयुक्तांपर्यंत सर्वांकडे धाव घेतली. मात्र, ''संबंधित प्लॉटवर कोर्ट केस सुरू असून तो न्यायप्रविष्ट आहे,'' असे तांत्रिक कारण पुढे करून महानगरपालिका हात झटकत आहे. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे लोकांचे आरोग्य महत्वाचे की न्यायालयीन तांत्रिक बाबी? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

उन्हाळ्याचे दिवस असूनही साचलेल्या कचऱ्यामुळे आणि सांडपाण्यामुळे परिसरात डेंग्यू व मलेरियासारख्या जीवघेण्या आजारांची भीती निर्माण झाली आहे. या परिसरात लहान मुले आणि ज्येष्ठांची संख्या मोठी असून, जर एखादी साथ पसरली तर त्याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल रहिवासी विचारत आहेत. कचऱ्याच्या ढिगाऱ्यात मोकाट जनावरांचा वावर वाढल्याने नागरिकांना ररस्त्यावरून चालणेही कठीण झाले आहे.

रहिवाशांनी आता आक्रमक पवित्रा घेतला असून



जिल्हाधिकाऱ्यांकडे याप्रकरणी हस्तक्षेपाची मागणी केली आहे. त्यांच्या प्रमुख मागण्या खालीलप्रमाणे आहेत:

मालकी हक्क बाजूला ठेवा, आधी सफाई करा: प्लॉटचा मालक कोणीही असला तरी सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने मनपाने तात्काळ तो भूखंड स्वच्छ करावा.

दोषींवर गुन्हे दाखल करा: परिसरात कचरा टाकणाऱ्यांवर सीसीटीव्हीच्या माध्यमातून लक्ष ठेवून त्यांच्यावर दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करावी.

जबाबदारी निश्चिती: घाणीमुळे उद्भवणाऱ्या आजारांमुळे कोणत्याही नागरिकाच्या जीवितास धोका निर्माण झाल्यास मनपा आयुक्त आणि स्वच्छता निरीक्षकांवर थेट कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

''न्यायालयीन प्रक्रियेचे नाव सांगून प्रशासन स्वतःची जबाबदारी टाळत आहे. लोकांच्या आरोग्याशी खेळण्याचा अधिकार प्रशासनाला कोणी दिला? जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ आदेश देऊन हा भाग कचरामुक्त करावा, अन्यथा रहिवासी रस्त्यावर उतरतील.'' असा ईशारा मोची गल्लीतील रहिवाशांनी दिला आहे.

आता या निवेदनानंतर महानगरपालिका प्रशासन कुंभकर्णी झोपेतून जागे होणार का?

आणि मोची गल्लीतील नागरिकांना या नरकयातनेतून मुक्ती मिळणार का? याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## जालना तालुक्यात भीषण वनाग्नी; २०० एकर जंगल राख, २ लाखांहून अधिक झाडे जळून खाक

### दोषींचे निलंबन करण्यासह फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आमदार बबनराव लोणीकर यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील शंभू सावरगाव, ढगी, काकडा आणि मोहाडी या गावांच्या शिवारातील वनक्षेत्रात लागलेल्या भीषण आगीत २०० एकरांहून अधिक जंगल जळून खाक झाले असून २ लाखांपेक्षा अधिक झाडांचे मोठे नुकसान झाल्याचा गंभीर आरोप आमदार बबनराव लोणीकर यांनी केला आहे. त्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असता प्रशासनाने दिलेल्या आकडेवारीत आणि प्रत्यक्ष स्थितीत मोठी तफावत आढळल्याचे सांगितले. सुरुवातीला सुमारे १५० एकर क्षेत्र जळाल्याची माहिती देण्यात आली होती, मात्र प्रत्यक्षात नुकसान यापेक्षा अधिक असल्याचा दावा त्यांनी केला आहे. तसेच आगीची माहिती वनविभागाकडे वेळेत पोहोचली नसल्याने आणि अधिकाऱ्यांनी तत्काळ प्रतिसाद न दिल्याने ही आग नियंत्रणाबाहेर गेल्याचा आरोपही त्यांनी केला. शनिवारी रात्री त्यांनी स्वतः अधिकाऱ्यांना माहिती दिल्यानंतरही प्रशासन दुसऱ्या दिवशी सकाळी घटनास्थळी पोहोचले, ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी नमूद केले.

या आगीत सागवान, कडुलिंब, पळस, वड, पिंपळ, आंबा यांसारख्या मौल्यवान वृक्षांसह मोठ्या प्रमाणात वनसंपत्ती नष्ट झाली असून वन्यजीवांचे अधिवासही उद्ध्वस्त झाले आहेत. त्यामुळे ही केवळ आग नसून मोठी पर्यावरणीय आपत्ती असल्याची भावना व्यक्त होत आहे. वनविभागात मोठ्या संख्येने अधिकारी-कर्मचारी असतानाही केवळ दोनच कर्मचारी आग विझवण्यासाठी उपस्थित होते, ही बाब प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे उदाहरण असल्याचे लोणीकर यांनी सांगितले. याशिवाय सुरुवातीला केवळ तीन गावांचा उल्लेख करण्यात आला असताना प्रत्यक्ष पाहणीत मोहाडी गावाचाही मोठ्या प्रमाणात आगीत समावेश असल्याचे उघड झाल्याने माहिती लपवण्याचा आरोप आमदार बबनराव लोणीकर यांनी केला आहे.

या प्रकरणी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशी, निलंबन तसेच फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करत लोणीकर यांनी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे तक्रार केली आहे. इतक्या मोठ्या घटनेबाबत उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना माहिती नसणे ही बाबही गंभीर असल्याचे त्यांनी नमूद केले. सध्या उर्वरित वनक्षेत्र




वाचवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज असून अन्यथा नुकसान आणखी वाढण्याची भीती आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केली आहे.

**सेवली किंवा नेर येथे अप्पर तहसील कार्यालय करा ; दुर्गम भागातील नागरिकांना दिलासा देणारी मागणी; प्रशासन सुलभ करण्यावर भर - आमदार बबनराव लोणीकर**

जालना तालुका भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण असल्याने अनेक गावे तहसील कार्यालयापासून दूर असून नागरिकांना शासकीय कामांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सेवली, नेर, जयपूर, सावंगी तलाव, विरेगाव या भागांतील नागरिकांना विविध दाखले आणि महसूल कामांसाठी वारंवार जालना तहसील कार्यालयात जावे लागत असून यासाठी त्यांचा वेळ, पैसा आणि श्रम खर्च होतात. वाढती गर्दी आणि कामकाजातील विलंब ही समस्या अधिक गंभीर बनत आहे. या पार्श्वभूमीवर आमदार बबनराव लोणीकर यांनी सेवली किंवा नेर येथे अपर तहसील कार्यालय स्थापन करण्याची मागणी केली आहे. स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून मांडलेली ही मागणी ग्रामीण जनतेसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मानले जात आहे. असे कार्यालय सुरू झाल्यास नागरिकांना जलद, सुलभ आणि पारदर्शक सेवा मिळेल तसेच जालना तहसीलवरील ताण कमी होण्यास मदत होईल. आमदार बबनराव लोणीकर यांच्या पुढाकारातून मतदारसंघावरील लक्ष आणि दूरदृष्टी अधोरेखित होत आहे.

**मंठा येथे औद्योगिक वसाहतीसाठी हालचाली वेगात; आमदार बबनराव लोणीकर यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना तातडीच्या कारवाईच्या सूचना**

मंठा तालुक्यातील मौजे उमरखेडा येथे प्रस्तावित औद्योगिक वसाहतीच्या उभारणीसाठी प्रक्रिया वेगाने सुरू करण्याच्या दृष्टीने आमदार बबनराव लोणीकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी संबंधित पत्राच्या अनुषंगाने तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. उमरखेडा येथील गट क्रमांक १, ८ व ९ मधील सुमारे २९.४३ हेक्टर अतिक्रमणमुक्त जमिनीवर औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. यापूर्वी उद्योग मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या ठिकाणी औद्योगिक वसाहत स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले होते. सदर प्रस्ताव पुढे नेण्यासाठी संबंधित जमिनीचे जिरायत दरानुसार मुल्यांकन करून भूसंपादन प्रक्रिया सुरू करणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. यासाठीच आमदार लोणीकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करत प्रक्रिया गतीमान करण्यावर भर दिला. या औद्योगिक वसाहतीमुळे मंठा तालुक्यात उद्योगांना चालना मिळून स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यावेळी भाजपा जालना ग्रामीण तालुकाध्यक्ष विक्रम ऊफाड ज्ञानेश्वर शेजुळ जिजाबाई जाधव विकास पालवे गजानन उफाड दिलीप जोशी कोमल कुचेरिया गणेश मोरे विनोद राठोड स्वरूप सानप बाळकृष्ण देशपांडे अतुल सेवलेकर अशोक तळेकर अरुण बोर्डे दत्ता बर्डे सतीश डुमे दादाराव अंभोरे रामेश्वर रोटे ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर झोरे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# संपादकीय पान

## मराठी शाळाच दर्जेदार

मार्च, एप्रिल महिन्यांमध्ये परीक्षा संपल्या की, विद्यार्थी निर्धास्त होतात कारण पुढील दीड दोन महिने त्यांच्यासाठी सुट्टीचे असतात. पण याच दोन महिन्यात पालकांना वेध लागतात ते आपल्या पाल्यांच्या पुढील शिक्षणाच्या प्रवेशाचे. दाखलपात्र विद्यार्थ्यांचे पालक म्हणजे ज्यांचे पाल्य पहिलीत दाखल होणार आहेत अशा पालकांमध्ये तर मोठा संभ्रम असतो. आपल्या पाल्यांना मराठी शाळेत दाखल करायचे की इंग्रजी शाळेत दाखल करायचे याबाबत त्या पालकांमध्ये मोठा संभ्रम असतो. मुलांचे शिकण्याचे माध्यम मराठी असावे की इंग्रजी यावर मग कुटुंबात मोठा खल होतो. नातेवाईक, शेजार पाजारी, मित्रमंडळी अशा पालकांना वेगवेगळा सल्ला देत असतात अशा वेळी कोणता निर्णय घ्यावा असा मोठा पेच या पालकांना पडतो. इंग्रजी भाषा ज्ञान भाषा असल्याने इंग्रजी माध्यमात शिक्षण घेण्याकडे बहुतेकांचा कल असतो आणि खरी फसगत इथेच होते. इंग्रजी येण्यासाठी इंग्रजी माध्यमातूनच शिक्षण घ्यावे असे काही नाही मराठी माध्यमातून शिक्षण घेऊनही मुल चांगल्या प्रकारे इंग्रजी शिकू शिकू शकते. आज जे उच्चपदावर बसलेले नामवंत व्यक्ती आहेत ते सर्व मराठी माध्यमातूनच आणि सरकारी शाळेतूनच शिकले आहेत. खरे तर आज जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेतून दर्जेदार शिक्षण दिले जाते. आज मराठी माध्यमांच्या शाळा देखील कात टाकत आहेत. मराठी माध्यमांच्या सरकारी शाळेत गुणवान, प्रयोगशील, तंत्रस्नेही शिक्षक आहेत. सर्व शिक्षक डी एड, बी एड, एम एड असे उच्च गुणवत्ता प्राप्त आहेत. हे शिक्षक वेगवेगळ्या अध्यापन पद्धतींचा वापर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देतात. मराठी माध्यमांच्या शाळेत ई लर्निंग, ॲक्टिव्हिटी बेस लार्निंग च्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. राज्यातील हजारो शाळा आय एस ओ नामांकन प्राप्त झाल्या आहेत. डिजिटल स्कूल, टॅब स्कूल या संकल्पना या शाळेतही रुजत आहेत. जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या शाळेतही आता सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यात आले आहेत. गुणवत्तेच्या बाबतीतही या मराठी शाळा कोठे कमी नाहीत. ५ वी आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत सर्वाधिक विद्यार्थी हे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीच असतात. नुकताच जवाहर नवोदय परीक्षेचा निकाल घोषित झाला. यात जिल्हा परिषद शाळेतीलच सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. याशिवाय मंथन, प्रज्ञाशोध या स्पर्धा परीक्षेतही मराठी शाळांचाच डंका वाजतो.जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेत मोफत शिक्षण दिले जाते. मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश, मोफत शैक्षणिक साहित्य, शालेय पोषण आहार, विविध शिष्यवृत्त्या मिळतात. गुणवत्तेसह सह शालेय उपक्रमातही मराठी शाळा आघाडीवर असतात. मराठी शाळेत पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा मेळावा, सहल, वनभोजन, क्षेत्रभेट, मातृ - पितृ पूजन, आनंदी बाजार, स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, ग्रंथदिंडी, वृक्षदिंडी, विविध स्पर्धा सर्व महापुरुषांच्या जयंत्या असे विविध उपक्रम राबवले जातात. आता मराठी माध्यमांच्या सरकारी शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थी दाखल होत आहेत. आता तर सर्वच मराठी शाळेत देखील सीबीएएससीचा अभ्यासक्रम शिकवला जात आहे म्हणजे जे शिक्षण इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळेत मिळते तेच शिक्षण आता मराठी माध्यमांच्या शाळेतही मिळत आहे तरीही शहरातील पालकांना अजूनही इंग्रजी शाळेचा मोह सुटत नाही. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून पालक त्या शाळांच्या नादी लागत आहेत. या इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी शिक्षणाचा बाजार केला आहे . अगदी के जी च्या प्रवेशासाठीही लाखोंची देणगी घेतली जाते शिवाय इमारत निधी, ट्रस्ट निधी तसेच वर्षभर चालणारे वेगवेगळे कार्यक्रम या माध्यमातून पैसे उकळले जातात. पालकांच्या खिशाला कात्री लावण्यासाठी या शाळा वेगवेगळे फंडे शोधत असतात. जर एखाद्या पालकांनी फी भरण्यास उशीर केला तर विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करण्यापर्यंत मजल या शाळांची जाते. २००३ मध्ये उच्च न्यायलयाने दिलेल्या निकालात शैक्षणिक साहित्य शाळेकडूनच किंवा ठराविक विक्रेत्यांकडूनच खरेदी करण्याची सक्ती करता येणार नाही असे म्हंटले आहे. सरकारनेही वेळोवेळी तसे आदेश काढले आहेत पण या शाळांना सरकारी आदेशाचा आणि न्यायालयाच्या निकालाचा विसर पडला आहे न्यायालये व सरकारला न जुमानता आपली शैक्षणिक दुकानदारी चालवणाऱ्या या शाळांना चाप लावायचा असेल तर पालकांनी आपल्या पाल्यांना या शाळेत दाखल करण्याऐवजी मराठी माध्यमांच्या शाळेत दखल करावे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

# बदलत्या हवामानामुळे देशासह विदर्भाने तापमानाच्या बाबतीत उच्चांक गाठला; स्वतःला सांभाळा

सध्याच्या परिस्थितीत उष्णतामान वाढल्याने देशासह विदर्भात आगडोंब सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. आजच्या परिस्थितीत विदर्भाने तापमानाच्या बाबतीत मोठा उच्चांक गाठल्याचे सर्वत्र उष्णतेचा कहर दिसून येतो.विदर्भातील अकोला शहराने देशात उच्चांकी कमाल तापमानाचा रेकॉर्ड केला असतांना दिनांक १९ तारखेला वर्धा जिल्ह्याने अकोल्याचा रेकॉर्ड मोडून ४५ अंश सेल्सिअस एवढी नोंद केली आहे.सध्या राज्यात विदर्भात वाढत्या उष्णतेमुळे आगडोंब उसळल्याचे चित्र आहे.ही अत्यंत भयावह परिस्थिती आहे. राज्यातील १५ जिल्ह्यात ४० हून अधिक कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. राज्यातील उष्णतेची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून विशेषतः विदर्भ विभागात तापमानाने धोकादायक पातळी गाठली आहे.सध्या वर्धा येथे ४५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून हा आकडा सध्या जगातील सर्वाधिक तापमानाच्या नोंदीपैकी एक मानला जात आहे.यावरून आपण समजू शकतो की, देशातीलच नाही,तर जगातील वाढते तापमान धोकादायक पातळी पोहोचले आहेत.याचे मुख्य कारण म्हणजे निसर्गाची हत्या, जंगलतोड,जगातील युद्धजन्य परिस्थिती, औद्योगिकरण, वाढते शहरीकरण, वाढते प्रदुषण आणि अत्याधुनिक सुख-सुविधा यामुळे देशासह जगातील तापमानात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते आणि त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे आज जगात तापमानाच्या बाबतीत देशातील विदर्भाची नोंद झाली असून इथे आगडोंब सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.आज विदर्भातील मुख्य शहराचे तापमानाच्या बाबतीत विचार केला तर अकोला -४५, वर्धा -४५, नागपूर -४४.४, अमरावती -४४.२, गोंदिया -४४.५, यवतमाळ -४३.२, ब्रम्हपुरी -४३.२, गडचिरोली --४३.२ अंश सेल्सिअस पर्यंत पोहचले आहेत.यामुळे विदर्भ जनूकाय आगीची भट्टी बनली की काय असे वाटत आहे.देशात बदलत्या हवामानामुळे काही भागात आगडोंब उसळला आहे,तर काही भागात गारपीट किंवा वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे हा सर्व प्रकार मानवाच्या अतिरेकामुळे निर्माण झालेली परिस्थिती आहे. विदर्भात हवामान खात्याने एलो अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे वाढते तापमान पहाता नागरिकांनी आपल्या प्रकृतीची काळजी घ्यावी.सुर्याचे अक्राळविक्राळ रूप पहाता नागरिकांनी उष्णतेपासून बचावासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करावे.घरून निघतांना काणाला व तोंडाला दुपट्टा बांधून निघावे,कॉटनचे कपडे घालावेत,पाणी जास्तीत जास्त प्यावे, थंड पेय घ्यावे,महत्त्वाचे काम असेल तर घराच्या बाहेर निघावे, लहान मुले व वृद्धांना बाहेर निघण्यापासुन सावधगिरी बाळगावी. कारण सुर्याने विदर्भात उष्णतेचे तांडव सुरू केले यापासून स्वतःला सांभाळने आवश्यक आहे.कारण जगात सर्वाधिक उष्णतेच्या बाबतीत विदर्भाची नोंद झाली आहे.अकोला, वर्धा या दोन्ही शहरांचा पारा ४५ अंश सेल्सिअसवर पोहोचला आहे आणि जगातील उष्ण शहरांच्या पहिल्या दहामध्ये नागपूर, अमरावती सह अन्य दहा शहराचा समावेश आहे. त्यामुळे देशासह विदर्भात जीवघेण्या उष्णतेमुळे सर्वत्र ‘‘अदृश्य संचारबंदी‘‘ असल्याचे वातावरण दिसून येते.कारण उन्हाच्या चटक्यामुळे सर्वत्र शांततेचे वातावरण दिसून येते. त्यासुळे उन्हापासून स्वतःला सांभाळा,सतर्क रहा, काळजी घ्या.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# दिव्यांगांच्या विविध मागण्यांसाठी अपंग जनता दलाचे आझाद मैदानावर आंदोलन

## जालना जिल्ह्यातून मोठी उपस्थिती

**मुंबई । प्रतिनिधी -** दिव्यांगांच्या प्रलंबित व जीवनावश्यक मागण्यांसाठी अपंग जनता दलाच्या वतीने २० एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात जालना जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

आंदोलनादरम्यान दिव्यांगांना दरमहा ६००० रुपये मानधन देण्यात यावे, संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत मानधन वेळेवर सुरू करावे, दिव्यांगांना घरकुल व जागा उपलब्ध करून द्यावी, तसेच दिव्यांगांवरील अन्याय व अत्याचारांविरोधात पोलिसांनी कडक भूमिका घ्यावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या. यासोबतच दिव्यांगांना कर्जमाफी द्यावी, महानगरपालिका, जिल्हा परिषद व ग्रामपंचायत स्तरावर ५ टक्के निधी खर्च करण्यात यावा, तसेच पाणीपट्टी व घरपट्टी करात ५० टक्के सवलत देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

तसेच अंत्योदय योजनेत दिव्यांगांना कठोर निकष लागू करू नयेत, शासनाच्या योजना कागदोपत्री न राहता जिल्हा स्तरावर प्रभावीपणे अंमलात आणाव्यात, दिव्यांगांच्या टक्केवारीबाबत योग्य न्याय द्यावा, एका डोळ्याने अंध असलेल्या व्यक्तींना ४० ते ४५ टक्के अपंगत्व मान्यता द्यावी, तसेच दिव्यांगांना कायमस्वरूपी ‘यूडीआयडी’ कार्ड देण्यात यावे, अशा विविध मागण्या यावेळी मांडण्यात आल्या.



या आंदोलनात अपंग जनता दलाचे कार्याध्यक्ष भाऊसाहेब दसपुते, जालना जिल्हाध्यक्ष राहुल मुळे, राजेंद्र चेके , उत्तम जुमडे, संदीप सोनार, ईश्वर लोखंडे, कुणाल झेंलडे, दिपाली शेंडगे, रजित शहा, नंद्री पाटोलकर, मुजीब शहा, गणेश मगर, राहुल वानखेडे, लक्ष्मण वाघे, जाकीर शेख, मीनाक्षी धोत्रे, शंकर चव्हाण, दिपाली गजानन पाटील, रंगनाथ आप्पा मल्हारी, इम्रान शेख, सुनील महाजन, गंभीर महाजन, मनीषा पाटील, येसान शेख, गजानन सोनार, अमोल चोपडे, विजय पवार, सिताराम राजाराम पाटील, संजू सोनवणे यांच्यासह अनेक दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# जालन्यात दरेगाव खून प्रकरणात विक्की मांडोळेसह चार जणांविरुद्ध तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

## कैलास दत्तू पवार यांच्या निर्घृण खून प्रकरणानंतर संतप्त जमावाने संशयित आरोपीचे घर जाळले

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात दोन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या व्यक्तीचा खून झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अनैतिक संबंधाच्या संशयातून ही हत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज असून, संतप्त जमावाने संशयित आरोपीचे घर जाळल्याने शहरात तणाव निर्माण झाला आहे. कैलास दत्तू पवार यांच्या निर्घृण खून प्रकरणानंतर परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून संतप्त जमावाने संशयित आरोपीचे घर जाळल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून पोलिसांनी तात्काळ बंदोबस्त वाढवला आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. प्राथमिक तपासात धारदार शस्त्राने वार करून खून केल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणात पोलिसांनी संशयित आरोपीला ताब्यात घेतले असून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
दरम्यान, या घटनेची माहिती परिसरात पसरताच संतप्त जमावाने संशयित आरोपीच्या सातविहीर परिसरातील घरावर हल्ला चढवत घराला आग लावली. या आगीत घरातील साहित्य जळून खाक झाले असून मोठे नुकसान झाले आहे. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.
घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. संभाव्य अनुचित प्रकार टाळण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.
तसेच जमावातील काही लोकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील कारवाई सुरू आहे.
या प्रकरणात आतापर्यंत चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून खून प्रकरणाचा तपास वेगाने सुरू आहे. पोलिसांकडून नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे.
दरम्यान, अल्पावधीत जिल्ह्यात घडलेल्या सलग खून घटनांमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

पान १ वरुन

## उपलब्ध पाण्याचे ...

योजनांची कामे तातडीने करावी यासाठी जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार या योजनांची कामे तातडीने आणि मोठ्या प्रमाणात पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. या कामांसाठी वित्त विभागाने तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, तसेच जुन्या जल स्त्रोतांची दुरुस्ती व पुनरुज्जीवनाच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे. यामुळे कमी पैशात जास्त पाणी साठा उपलब्ध होईल. कमी पावसाच्या परिस्थितीतही सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देणारी हीच साधने प्रभावी ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. ‘जी रामजी योजने’तून होणारी जलयुक्त शिवारची कामे योग्य प्रकारे झाली आहेत की नाही,

यावर लक्ष ठेवण्यासाठी तसेच जी रामजी मधून जास्तीत जास्त कामे मिळविण्यासाठी टास्क फोर्स तयार करावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील पर्जन्यमान ९० टक्क्यांपेक्षा कमी राहिल्यास पिण्याच्या पाण्यासह शेतीवर मोठा परिणाम होतो. अशा परिस्थितीत नुकसान कमी करण्यासाठी पूर्वतयारी करण्यात यावीत. मनरेगा योजनेअंतर्गत जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देऊन उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करण्याचेही निर्देश त्यांनी यावेळी दिले. तसेच पिण्याच्या पाण्याबाबत केवळ चालू वर्षाचा नव्हे, तर पुढील उन्हाळ्याचाही विचार करून नियोजन कराव्यात. पावसातील संभाव्य घट लक्षात घेऊन पाणी साठवून ठेवणे आणि त्याचा काटेकोर वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

पाणी बचतीसाठी आणि इतर पूरक उपाययोजनांसाठी प्रत्येक जिल्ह्यात स्थानिक स्तरावर टास्क फोर्स स्थापन करण्यात यावे. जिल्हाधिकारी, सिंचन विभागाचे अधिकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी यांच्या समन्वयातून पाण्याचा काटेकोर वापर आणि साठवणूक सुनिश्चित केली जावी, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले.

वैरण विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत

पशुधनासाठी चारा टंचाई होऊ नये यासाठी आतापासूनच उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले. एल निनोचा परिणाम इतर राज्यांवरही होण्याची शक्यता असल्याने बाहेरील राज्यांवर अवलंबून न राहता राज्यातच वैरण विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत. धरणांच्या बॅक वॉटर क्षेत्रात वैरण विकास कार्यक्रम हाती घेण्यांत यावा. मोठ्या प्रमाणात पशुधन असणाऱ्या तसेच चारा टंचाई जाणविणाऱ्या सोलापूर, सांगली आणि मराठवाडा या भागांमध्ये चारा उपलब्ध कसा होईल, याकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

खतांच्या उपलब्धतेबाबत तात्काळ निर्णय घेऊन अंमलबजावणी करावी. ‘ॲग्रीस्टॅक’ प्रणालीशी खत वितरण जोडून पारदर्शकता वाढविणे, तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने तपासणी यंत्रणा मजबूत करण्यावर भर देण्यात यावा, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

**शेततळे योजनेवर भर द्यावा - कृषी मंत्री दत्तात्रय भरणे**

यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, संभाव्य एल निनोच्या पार्श्वभूमीवर कृषी विषय प्रभावीपणे हाताळण्यासाठी कृषी विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली असून विविध उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. उद्भवू शकणाऱ्या संभाव्य अडचणींचा पूर्वानुमान करून त्यासाठी आवश्यक तयारी करण्यावर भर देण्यात आला आहे.

यंदाच्या पावसातील अनिश्चिततेमुळे खरीप हंगामातील पिकांचे नुकसान होऊ नये, यासाठी शेतकऱ्यांना वेळेवर खतांचा पुरवठा होणे अत्यावश्यक आहे. विशेषतः डीएपी खताचे वितरण नियोजनबद्ध पद्धतीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून त्यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश दिले जाणार आहेत. खते आणि बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी कृषी विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सर्व विक्री केंद्रांची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे भरणे यांनी सांगितले.

कृषिमंत्री भरणे म्हणाले की, पावसाच्या अनियमिततेमुळे चाऱ्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यावरही उपाययोजना करण्यात येत आहेत. महाबीज तसेच इतर बियाणे व चारा पुरवठा करणाऱ्या संस्थांना आवश्यक साठा उपलब्ध ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दुबार पेरणीची वेळ उद्भवल्यास अतिरिक्त बियाण्यांचा पुरवठा करण्यासाठीही संबंधित संस्थांना सज्ज राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना पाणी साठवणुकीसाठी शेततळे योजना प्रभावीपणे राबविण्यावर भर देण्यात यावा. त्यासाठी आवश्यक साहित्य, विशेषतः प्लास्टिक लाइनिंग उपलब्ध करून देण्यात यावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी कृषी विभाग पूर्णपणे सज्ज**

संभाव्य संकटाचा सामना करण्यासाठी कृषी विभाग पूर्णपणे सज्ज असून शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्यात येत असल्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले.

यावेळी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, अपर मुख्य सचिव के. एच. गोविंदराज, बृहन्मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, पर्यावरण विभागाचे सचिव जयश्री भोज, पशुसंवर्धन सचिव एन रामास्वामी, मृद व जलसंधारण विभागाचे प्रधान सचिव माणिक गुरसाळ, राज्य आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण, भारतीय हवामान शास्त्र विभागाचे अतिरिक्त महासंचालक साई कृष्णन आदींसह उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्थानचे संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे संचालक, आयमेट वेदर सर्व्हिसेसचे संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र संचालक उपस्थित होते.

## सिंधी काळेगाव ...

नुकसानीची सविस्तर माहिती घेत शेतकरी सदाशिवराव मुळे यांना धीर दिला.

पाहणीदरम्यान आमदार खोतकर यांनी संबंधित महसूल व पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांना त्वरित पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या. तसेच शासनाकडून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी यासाठी आवश्यक ती कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्याचे आदेश दिले. ‘‘अशा नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळणे अत्यंत आवश्यक आहे,’’ यासाठी मी पाठपुरावा करुन लवकरच मदत मिळवून देणार असेही त्यांनी यावेळी सांगितले. या प्रसंगी शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, नायब तहसीलदार राजू निहाळ, सरपंच आबाजी गिराम, सखाराम गिराम,साळुराम गिराम, विष्णूपंत गिराम निवृत्ती मुळे ,वैद्यकीय अधिकारी, कृषी सहायक व कर्मचारी तसेच परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अवकाळी पाऊस व वीज कोसळण्याच्या घटनांमुळे सध्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून प्रशासनाने सतर्क राहून त्वरित मदत करावी.

# महापुरुषांच्या कृतीशील विचारांची समाजक्रांती व्हावी !




**जालना । प्रतिनिधी -** समाजातील वंचित,उपेक्षित घटकातील प्रत्येकाला मानवतेचा कृतीशील विचार देणारा महात्मा बसवेश्वर यांचा अनुभवमंडप हा विचार श्रमाची, मानवतेची शिकवण देणारा विचार आहे. धर्म- जात,पंथ हा विचार महत्वाचा नसून महापुरुषांच्या कृतीशील

विचारांची समाजक्रांती जाणीवपूर्वक व्हावी,असा विचार प्रा.अर्जुन जाधव यांनी विशेष अनुभवसभेत बोलताना मांडला.

महाराष्ट्र शरण साहित्य परिषद,जालना शाखेतर्फे रविवारी ( ता.१९) सायंकाळी ७ वाजता शहरातील जुना जालना टाऊन हॉल परिसरातील

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात अनुभव सभेचे आयोजन करण्यात आले होते. अनुभवसभेचे सभापती म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ मधुकर अप्पा लिंगायत हे होते. यावेळी ज्येष्ठ लेखक,विचारवंत प्रा.अर्जुन जाधव, ज्येष्ठ विचारवंत माधव बावगे, स्वागताध्यक्ष दयानंद एकघरे, प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा जालनाचे अध्यक्ष शंकर अप्पा सवादे, शरण साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा.बसवराज कोरे, डॉ.यशवंत सोनुने, माजी साखर आयुक्त के.ई.हरिदास यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात सभेची भूमिका मांडताना ज्येष्ठ साहित्यिक प्रा.बसवराज कोरे म्हणाले,की आजच्या वर्तमानात महापुरुषांचे विचार आत्मसात न करता ढोंगीपणा,भोंदूगिरीचे प्रदर्शन करण्याचे अवास्तव महत्व दिल्याने विचार आणि परिवर्तन घडवून येत नाही. महाराष्ट्र शरण साहित्य परिषदेची भूमिका प्रास्ताविकात प्रा.बसवराज कोरे यांनी मांडली.

अनुभव सभेत महात्मा बसवण्णाची परिवर्तनवादी लिंगायत चळवळ या विषयावर विचार मांडताना विचारवंत,ज्येष्ठ लेखक प्रा.अर्जुन जाधव म्हणाले,की सामाजिक परिवर्तन विचारांचा जालना पॅटर्न हा राज्यभर पोहोचविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न व्हावेत.

महात्मा बसवेश्वर आणि गौतम बुध्द यांच्या विचारात साम्यता कशी येते,याचा संदर्भ देत अनुभवमंडप मध्ये स्त्रीपुरूष समानता मानली जाते.आजच्या काळात अशा महापुरुषांच्या कृतीशील विचारांची क्रांती होईल,तेव्हाच समाजात परिवर्तन घडवून येईल,असा आशावाद प्रा.जाधव यांनी मांडला. महात्मा फुले यांचा सत्यधर्मआणि महात्मा बसवेश्वर यांचा अनुभवमंडप हा समाजातील सर्व घटकांना समानतेचा एकसंघ विचार आजच्या वर्तमानात अपरिहार्य ठरतो,हे वास्तव आपण स्वीकारले पाहिजे,असेही प्रा.जाधव यांनी सांगितले.

लेखक अशोक कामत यांच्या

महात्मा बसवेश्वर या पुस्तकाने आपण भारावून जात पुढील काळात याच विचाराने प्रेरित झाल्याचे प्रा.जाधव यांनी सांगितले.

जातीयवाद, वर्गवाद, प्रांतवाद, धर्म-संप्रदायवाद, पक्षीय राजकारण, संघटनावाद यांना मूठमाती देऊन केवळ मानवतावादी भूमिकेतून सर्वांना विचारांची

शिदोरी वाटण्याचे कार्य जालना शाखेतर्फे करण्यात येते,हाच विचारांचा पॅटर्न राज्यभर जावा,असेही प्रा.जाधव म्हणाले. अनुभवसभेत विचार मांडताना सामाजिक कार्यकर्ते आणि ज्येष्ठ विचारवंत माधव बावगे म्हणाले,की आजकाल जयंतीचे स्वरुप काय यावर डोक्यावर घेवून नाचण्यापेक्षा विचार डोक्यात ठेवून जयंती साजरी करता आली पाहिजे. विवेकी विचाराने मानवता धर्म जोपासता आला पाहिजे. समाजातील रुढी, परंपरा झुगारून कृतीशील विचार आचरणाने खरे परिवर्तन होईल,असे माधव बावगे यांनी सांगितले. शिक्षणाने अंधश्रध्दा कमी झाल्या की जास्त वाढल्या यावर गांभिर्याने विचार करता आला पाहिजे. शिक्षणाने नेमके काय दिले असा प्रश्न उपस्थित करून देवभूमीतला अधर्म प्रकार,बुवाबाजी भोंदूबाबा असे प्रकार होतात. जात धर्माच्या नावावर चाललेला हैदोस आपण महात्मा बसवेश्वर यांच्या विचाराने संपविला पाहिजे,असेही आवाहन श्री.बावगे यांनी केले.

सभेत जीवन गौरव पुरस्काराने ज्येष्ठ विचारवंत माधव बावगे ( लातूर), साहित्य सेवा पुरस्कार : प्रा. अर्जुन जाधव (ज्येष्ठ लेखक, विचारवंत, धाराशिव) यांना गौरविण्यात आले. सन्मानचिन्ह, शाल आणि रोख रक्कम पाच हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरुप होते.

अनुभवसभेत मान्यवरांच्या पुरस्कार मानपत्राचे वाचन विनोद वीर,शारदा व्यवहारे यांनी केले. अनुभवसभेचे सूत्रसंचालन राजेंद्र वाजुंळे यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ.सुहास सदाव्रते यांनी मानले.

## शिक्षक पतसंस्थेत महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी



**जालना । प्रतिनिधी -** जालना व बदनापूर तालुका जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्थेत महात्मा बसवेश्वर यांची जयंती विनम्र अभिवादन करून साजरी करण्यात आली.

याप्रसंगी चेअरमन जगत घुगे, व्हाईस चेअरमन साधनाताई जैवाळ, सचिव संतोष देशपांडे, संचालक सुभाष भडांगे, गणेश भुतेकर, व्यवस्थापक ज्ञानेश्वर मराठे, शैलेश धोत्रे, हिमेश तोडकर आदींची उपस्थिती होती. यावेळी जगत घुगे यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. त्या काळातील चाली, रुढी अत्यंत वाईट परिस्थितीत होत्या. त्यावर महात्मा बसवेश्वर यांनी घनाघात केला आणि समाज उपयोगी अनेक चांगल्या गोष्टीला प्रेरणा दिली. जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती देह दिसतो परोपकारे या संतोक्तीनुसार संतांचे कार्य त्रिकाल बाधित आहे. त्यांच्या सम्यक दृष्टीमुळे नक्कीच समाज परिवर्तन घडण्यास मदत होते. आजही त्यांच्या विचाराची गरज आहे, असे ते म्हणाले.

## जालना ज्येष्ठ नागरिक मंचतर्फे शुक्रवारी ॲड. किशोर राऊत यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** येथील जालना ज्येष्ठ नागरिक मंच व ज्येष्ठ नागरिक महिला मंच यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा जोतीराव फुले द्विजन्मशताब्दी वर्ष, डॉ.बाबासाहेब आंबेड्कर जयंती व महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन दि.२४ एप्रिल, शुक्रवार रोजी सायंकाळी साडेचार वाजता मराठा सेवा संघ सभागृह,भाग्यनगर जुना जालना येथे करण्यात आले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेड्कर यांची राज्यघटना आणि वाटा,पळवाटा '', या विषयावर प्रसिध्द विधिद्न्न ॲड.किशोर राऊत यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मंचचे अध्यक्ष तुळशीराम शेळके, अंकुशराव राऊत, प्रा.डॉ.रावसाहेब ढवळे, धर्मा खिल्लारे, प्रा.राजकुमार बुलबुले, काकासाहेब खरात, किसनराव मिसाळ, सुषमाताई पायगव्हाणे यांनी केले आहे.

# परिस्थितीपेक्षा मनस्थिती महत्त्वाची! - देवेंद्र भुजबळ

परिस्थितीला शरण जाऊ नका. कोणत्याही गोष्टीचा बाऊ करू नका. तुमच्यापेक्षा अनेकांची परिस्थिती वाईट आहे,तरीही ते जर

प्रतिकूल परिस्थितीवर मात करू शकतात, तर मी का नाही मात करु शकणार ? असा विश्वास युवक-युवतींमध्ये निर्माण करण्यासाठी मी प्रयत्न करीत असतो आणि म्हणुनच परिस्थितीपेक्षा मनस्थिती महत्त्वाची असते, हे त्यांच्यावर बिंबवण्याचा प्रयत्न करीत असतो, असे प्रतिपादन न्यूज स्टोरी टुडे चे संपादक तथा निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ यांनी येथे केले.
अहिल्यानगर येथील स्नेहालयाचे लोकमाध्यम या कार्यक्रमाच्या रेडिओ नगरच्या नगर डायरी या कार्यक्रमांतर्गत आर.जे यांनी त्यांची नुकतीच मुलाखत घेतली, त्यावेळी पालक व युवकांशी संवाद साधताना ते बोलत होते.

श्री भुजबळ पुढे म्हणाले, मुंबईत एक मुलगा दिवस भर भीक मागायचा आणि रात्रीच्या शाळेत जाऊन शिकायचा.पुढे तो मुंबई महानगरपालिकेत अधिकारी झाला . नंदूरबार जिल्ह्यातील दारू विकणाऱ्या महिलेचा मुलगा जिल्हाधिकारी झाला. आदिवासी कुटुंबातील दोन भाऊ ज्यांच्या घरी सातवीपर्यंत लाईट नव्हती,साधा टी.व्ही. देखील नव्हता, तरीही ते आयएएस अधिकारी झाले. नगर जिल्ह्यातील ग्रामकन्या तेजस्वी सातपुते आयपीएस अधिकारी झाली. शिक्षणाचा काहीही वारसा नसताना कुणी डॉक्टर, इंजिनीयर ,उद्योजक, प्राध्यापक ,कलाकार , पत्रकार झाले. परिस्थिती नसताना त्यांनी स्वतःच्या हिमतीवर स्वतः ची वाट निर्माण केली . अशा या सर्व यशकथा ''गगन भरारी '', ''प्रेरणेचे प्रवासी '', ''आम्ही अधिकारी झालो '', ''समाजभूषण'', ''माध्यमभूषण'', ''कला साहित्य भूषण'', ''संवादभूषण'' या माझ्या पुस्तकांमध्ये आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

बहुराष्ट्रीय कंपन्या सोडून तुम्ही विचारपूर्वक माध्यम क्षेत्र निवडले, जवळपास चाळीस वर्षाहून अधिक वर्ष तुम्ही माध्यम क्षेत्रात सक्रिय आहात. त्याबद्दल काय सांगाल? असा प्रश्न त्यांना विचारला असता त्यावर उत्तर देताना ते म्हणाले, आर्थिकदृष्ट्या कमजोर असल्यामुळे मला नवव्या वर्गापासून नोकऱ्या करीत शिकावं लागलं. काही बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी मी विक्रेता म्हणुन काम केले. त्या कामामुळे सर्व महाराष्ट्र भर फिरता आले. कसे वागायचे, बोलायचे हे शिकायला मिळाले. पण देशातील पैसा आपण परदेशात पाठवित आहोत, ही भावना अस्वस्थ करीत असे. त्यामुळे जन जागृती करता येईल, असे काम करावेसे वाटू लागले आणि म्हणुन मग मी पत्रकारितेकडे वळलो. नगर कॉलेज मध्ये शिकत असताना, नगरमधील दैनिक समाचार मध्ये

उपसंपादक कम वार्ताहर म्हणुन काम केले. पुढे पुणे विद्यापीठाच्या रानडे इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेऊन पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण केला. पुण्यातील दैनिक केसरीमध्ये मी उपसंपादक म्हणून काम केले. त्यानंतर साप्ताहिक सह्याद्री मध्ये विशेष प्रतिनिधी म्हणून काम केले. पुढे १ मार्च १९८६ पासून मुंबई दूरदर्शनमध्ये आधी सहाय्यक निर्माता व त्यानंतर निर्माताही झालो.

माझी १९९१ साली यूपीएससी मार्फत भारत सरकारच्या दूरदर्शन, आकाशवाणी मधील निर्मात्याच्या तीन पदांसाठी,भारतीय माहिती सेवेतील वरीष्ठ श्रेणी पदासाठी, कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात पत्रकारितेचा अधिव्याख्याता आणि सहावी ऑर्डर आली तीमहाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क खात्यात जिल्हा माहिती अधिकारी ,वर्ग १ म्हणुन.शेवटी साधकबाधक विचार करून अलिबाग येथे जिल्हा माहिती अधिकारी या पदाची सूत्रे स्वीकारली. पुढे उपसंचालक आणि संचालक अशी माझी वाटचाल झाली .

प्रत्येक ठिकाणी नियमित कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडत असतानांच शासनासाठी , समाजासाठी जे काही वेगळे, उपयुक्त करता येईल, ते ते करण्याचा प्रयत्न करीत राहिलो.

पुढे निवृत्ती नंतर, स्वतः इंग्रजी पत्रकारिता करणाऱ्या

मुलीच्या मार्गदर्शनाखाली

कोरोनाच्या काळात न्यूज स्टोरी टुडे हे वेब पोर्टल सुरू केले. त्यात कला, साहित्य, संस्कृती, सामाजिक, आर्थिक विकास, यश कथा, विश्व बंधुत्व आदी विषयांवर लेखन असते.

आकाशवाणीमध्ये शासनाच्या दिलखुलास कार्यक्रमाचा अनुभव कसा आहे, असा प्रश्न विचारला असता ते म्हणाले, आकाशवाणीवर १६ नोव्हेंबर २००६ पासून सुरू झालेल्या दिलखुलास कार्यक्रमाच्या पहिल्या ५०० भागाचा मी टीम लीडर होतो. या कार्यक्रमात केवळ मंत्री आणि अधिकाऱ्यांच्या मुलाखती न घेता शासकीय पुरस्कार प्राप्त लेखक, कवी, खेळाडू

अशा विविध क्षेत्रांतील व्यक्तींच्या मुलाखती घेतल्याने

कार्यक्रम मनोरंजक आणि विविधांगी होत असे.

माझं उपसंचालक, वृत्त विभाग हे मूळ पद सांभाळुन

मी हे कामही मनापासून केले . अर्थात कार्यक्रमाच्या

सुरुवातीला आकाशवाणी ऐकतेच कोण, अशी टीका होत होती. पण प्रत्येक माध्यमाची मर्यादा असते, एक शक्ती असते. मात्र रेडिओ त्याच्या वैशिष्ट्यांमुळे टिकून आहे. आणखी त्यात वैविध्य येत आहे. ज्याला ऐकायचे तो बरोबर आकाशवाणी ऐकतो, अशी त्यांनी आकाशवाणीची महती विशद केली.

आज अनेक ठिकाणी रेडिओ केंद्र सुरू झाले आहेत. पूर्वी रेडिओला भौगोलिक मर्यादा होती. आता मात्र इंटरनेटमुळे सीमा राहिली नाही. भारत सरकारच्या धोरणामुळे खासगी रेडिओ केंद्रे सुरू झाली. त्यातीलच आपलेही हे रेडिओ केंद्र आहे . म्हणजे रेडिओची व्याप्ती वाढली असल्याचे भुजबळ यावेळी म्हणाले.

दूरदर्शनमध्ये तुम्ही काम केले, तेथे वेगवेगळे कार्यक्रम झाले, संहिता लेखन केले, त्यात तुमची सरकारी नोकरी या सगळ्या गोष्टी तुम्ही कशा जुळवून आणल्या ? असा प्रश्न मुलाखतकाराने




केला असता, त्यावर भुजबळ म्हणाले, मुळात गरज असते ती इच्छाशक्तीची. इच्छा तेथे मार्ग अशी आपल्याकडे म्हण आहे. तुम्च्यात इच्छा असेल तर शक्ती निर्माण होते. त्या दृष्टीने आपल्याला काही कल्पना सूचतात. तसेच

वेळेचे नियोजन फार महत्वाचे असते. हे सर्व

जास्तीचे कार्य करीत असताना शासकीय नोकरीत दैनंदिन कर्तव्य, जबाबदाऱ्या असतातच. काम चांगलं झालं ,म्हणुन कुणी कौतूक करेल, याची काही हमी नसते. पण चूक झाली तर तुमची नोकरी जाण्याची शक्यता असते. त्यामुळे सरकारी नोकरीत सांगितलं तेवढं काम करायचे, पगार मिळतो ना, मग कशाला जास्तीच्या गोष्टी करायच्या ? अशी अनेकांची मनोवृत्ती असते. खरं म्हणजे, सरकारी नोकरीत अधिकाऱ्यांना खूप स्वातंत्र्य मिळालेलं असते. क्लार्क क्लार्कचेच काम करेल, कॅशिअर कॅशिअरचेच काम करेल, ड्रायव्हर ड्रायव्हिंगचेच काम करेल पण अधिकाऱ्यांच्या बाबतीत तसे नसते. समजा एखादा जिल्हाधिकारी येतो, त्याची नवे काही करण्याची इच्छा असते, त्याच्याकडे कल्पकता असते, म्हणून तो चांगले काम करु शकतो. अन्यथा तो आला म्हणुन सरकार आहे ती यंत्रणा बदलून देत नाही, की वर्षाचे आर्थिक बजेट वाढवून देत नाही. तरीही तो अधिकारी सर्व लोकप्रतिनिधी, अधिकारी कर्मचारी, नागरिक अशा सर्वांच्या सहकार्याने काम करीत असतो. एक व्यक्ती बदलली की सर्व चित्र बदलून जाते. हे जास्तीचे काम आहे म्हणून मी रोजचं काम कशाला करू, असे मी तर कधी म्हटलेच नाही. उलट रोजच्या जबाबदारी, कर्तव्य पार पाडावेच लागतात.

माध्यम क्षेत्रातील अनुभवांविषयी बोलताना

ते म्हणाले, माध्यमे सरकारी असोत की खाजगी माध्यमे असोत , या माध्यमांतील लोकांना दिवाळी, दसरा असला की, जास्तीचे काम करावे लागते. त्यांना सुट्टीच्या दिवशी सुट्टी मिळेलच याची खात्री नसते. त्यामुळे व्यक्तिगत आवडीनिवडी, कौटुंबिक जबाबदाऱ्या याकडे दुर्लक्ष करावे लागते. तसेच प्रसंगी पंचतारांकित हॉटेलमध्ये खायला प्यायला मिळेल,तर कठीण परिस्थितीत पाणी पिण्याची, नैसर्गिक विधी करण्याची देखील सोय नसते . माध्यम क्षेत्र ग्लॅमरस जरी असले, तरी त्यातील कष्ट, आव्हाने लक्षात घेऊनच युवकांनी या क्षेत्राकडे यावे, असे मी सांगत असतो. अन्यथा ग्लॅमरस आहे म्हणून अनेक मुलं-मुली या क्षेत्रात येतात. त्यांनी मास्टर्स कोर्स केलेले असतात. त्यांच्या पैकी कुणी वृत्तपत्रात, कुणी रेडिओ कुणी टीव्हीमध्ये जातो. माध्यमात इतकं काम असते, हे पाहून मात्र अनेकांचा भ्रमनिरास होतो.

पुस्तकांचा विषय निघाला म्हणून विचारते, तुम्ही अकरा पुस्तके लिहिली आहेत, त्याबद्दल काय सांगाल ? या प्रश्नाच्या उत्तरात ते म्हणाले, मी ज्या परिस्थितीतून गेलो आहे, माझं एक तत्व आहे की, परिस्थितीचा बाऊ करू नका. माणसाच्या परिस्थिती पेक्षा मनःस्थिती महत्वाची आहे. परिस्थिती अनुकूल असेल, पण मनःस्थिती चांगली नसेल तर माणूस काहीही करू शकत नाही. मनःस्थिती पक्की आणि जिद्द असेल तर काहीही होऊ शकते. माझी अशी पाच पुस्तके आहेत, जसे गगनभरारी. या पुस्तकात २६ महिलांच्या यशकथा आहेत. पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांची सुंदर प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. या पुस्तकात एक अंध मुलगी बँकेत अधिकारी कशी झाली, खुद्द नगरच्या भाजी विकणाऱ्या कवयित्री - सामाजिक कार्यकर्त्या बेबीताई गायकवाड , अशांच्या यशकथा त्या पुस्तकात आहे.

म्हणून मी म्हणतो, परिस्थितीला बळी पडू नका, आई वडिलांना नावे ठेऊ नका, देव-परमेश्वर मानत असल्यास त्यालाही नावे ठेऊ नका, तर स्वतःवर विश्वास ठेवा, स्वतः चे उद्दिष्ट ठेवा, उद्दिष्टांसाठी जिद्दीने मेहनत करा, असा सल्ला त्यांनी युवकांना या मुलाखतीतून दिला.

प्रेरणेचे प्रवाशी, आणखी एक पुस्तक करिअरच्या नव्या दिशा या पुस्तकात ७०० पेक्षा अधिक कोर्सेसची माहिती दिलेली आहे. आपली आवड ओळखा आणि आपल्या करिअरची दिशा ठरवा, असे आपण सांगत असतो. आई-वडिलांचा आग्रह असतो की, मुलाने किंवा मुलीने डॉक्टर नाहीतर इंजिनिअर व्हावे असा आग्रह असतो. पण मुलांचा कल कशात आहे, हे लक्षात घेऊन त्यांचं करिअर त्यांना निवडू द्या. उगाच त्यांच्यावर प्रेशर आणू नका. त्यांच्या आवडीनुसार त्यांनी क्षेत्र निवडले की, त्यांनाही आनंद वाटेल आणि ते पुढे जातील. गेल्या दहा वर्षात नैराश्यातून आयआयटीमधील पहिल्या ते चौथ्या वर्षांपर्यंतच्या जवळपास ११५ जणांनी आत्महत्या केल्या आहेत. एमबीबीएस किंवा एमडीचे शिक्षण घेणाऱ्या १२५ जणांनी गेल्या पाच वर्षांत आत्महत्या केल्या, पोलीस दलातील ४५ जणांनी आत्महत्या केल्या आहेत. खुद्द सर्वोच्च न्यायालयाने भारत सरकारलानिर्देश दिले आहेत की , देशातील आत्महत्यांमध्ये युवकांच्या आत्महत्या पहिल्या क्रमांकावर असल्याने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष द्यावे. दुसरे म्हणजे युवकांमध्ये ताणतणाव वाढलेला आहे आणि तिसरी बाब म्हणजे युवकयुवती व्यसनाधीनतेकडे वळत आहेत. या सर्व बाबींचा आपण साकल्याने विचार केला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यापुर्वी तुम्ही स्नेहालयात आला होतात, तर पूर्वीचे स्नेहालय आणि आताचे स्नेहालय यात काय बदल झाला, असे आपणास वाटते? या प्रश्नावर बोलतांना भुजबळ म्हणाले की,वेश्या हा शब्द आज देखील चारचौघात उच्चारणे सभ्य सभ्यपणाचे समजल्या जात नाही तर चाळीस वर्षांपूर्वी काय परिस्थिती असेल? अशा परिस्थितीत स्नेहालय सुरू करणे, ते सातत्याने चालविणे ही फार मोठी गोष्ट आहे. आज इथे काळानुरूप बदल झाले, नवीन प्रकल्प येत आहेत, नवीन उपक्रम सुरू करण्यात आले आहेत आणि एकंदरीतच स्नेहालय दिशादर्शक काम करीत असल्याचे त्यांनी नमूद केले.

आता तुम्ही नगरमध्ये आलात, या शहरात काय बदल झाले असे आपणास वाटते? या प्रश्नावर बोलताना भुजबळ म्हणाले, नगरमध्ये खूप बदल झालेले आहेत. पूर्वी म्हणजे ४० वर्षापूर्वी जगातील एक खेडे म्हणून नगरला म्हटले जात असे.आता मात्र नगरमध्ये रस्ते झाले, फ्लायओव्हर झाले. थोडक्यात पायाभूत सुविधा निर्माण झाल्या. पूर्वी नगरपालिका होती, आता महानगरपालिका झाली. मेडिकल, इंजिनीयरिंग कॉलेज आणि वेगवेगळ्या शैक्षणिक संस्था सुरू झाल्या. देशातील हा महत्वाचा जिल्हा आहे. तो अशासाठी की, या जिल्ह्यात सहकारी संस्था आहेत. लष्कराच्या दृष्टीने हे महत्वाचे केंद्र आहे.रणगाडे केंद्र , व्हीआरडीइ , एमआयडीसी असा खूप बदल झाला आहे आणि होत आहे पण नगरकरांना एक आवाहन करावेसे वाटते, ते म्हणजे वाहतुकीची शिस्त पाळली पाहिजे. कारण वाहतुकीचे कोणतेही नियम, अथवा कायदे आपल्यासाठी, स्वतःच्या सुरक्षिततेसाठी तयार केले जातात. त्यामुळे दुसऱ्याच्या जीवाची सुरक्षितता तेव्हढीच पाळली पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शेवटी रेडिओ नगरचे आभार मानताना त्यांनी भविष्य काळात काही योगदान द्यायचे झाल्यास, ते अवश्य देईल,अशी ग्वाही दिली.

ही मुलाखत संपन्न झाल्यावर रेडिओ नगर चे प्रमुख, जेष्ठ पत्रकार श्री भूषण देशमुख यांनी श्री भुजबळ यांचा सत्कार केला.

तर भुजबळ यांनी,त्यांचे माध्यमभूषण पुस्तक भेट दिले.

**शब्दांकन : शेषराव वानखेडे, ज्येष्ठ पत्रकार. ह.मु. गांधीनगर, गुजरात +९१ ९८६९४ ८४८००**

# जालना जिल्हा घाटी रुग्णालयात संतापजनक प्रकार; रुग्णांकडूनच बेडशीट बदलून घेतल्याने प्रश्नचिन्ह

## व्हिडिओ समोर आल्यानंतर कारवाईची मागणी, लोकप्रतिनिधींवरही नाराजी

**जालना । प्रतिनिधी -** हा जिल्हा घाटी रुग्णालयातील काय प्रकार आहे? जालना कर्मचाऱ्यांना पगार मिळत



नाही का? की फुकटचे खायची सवय झाली? वरिष्ठ अधिकारी झोपा घेतात काय? पेशंट आणि त्यांच्या नातेवाईकांकडून पलंगावरील बेडशीट बदली करून घेताना लाजा कशा वाटत नाहीत? असे संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

गोरगरिब जनता खाजगी रुग्णालयामध्ये पैसे खर्च करू शकत नाही म्हणून घाटी रुग्णालयामध्ये येतात. मात्र येथे कर्मचाऱ्यांची अरेरावीची भाषा, उद्धटपणे बोलणे हे गोरगरिब जनतेला नेहमीचेच झाले आहे, अशी तक्रार नागरिकांनी व्यक्त केली आहे.

जालन्यातील शासकीय सामान्य रुग्णालयामध्ये चक्क रुग्णांच्या पलंगावरील बेडशीट बदलण्यासाठी कर्मचाऱ्यांनी फर्मान सोडले. एवढेच नव्हे तर गोरगरिब रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांकडूनच बेडशीट बदलून घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हे करत असताना काही कर्मचारी त्यांना आदेश देत असल्याचेही दिसून आले.

दरम्यान, एका सुज्ञ नागरिकाने या संपूर्ण घटनेचे व्हिडिओ चित्रिकरण केल्यामुळे हा प्रकार उघडकीस आला. मात्र, मागील कित्येक महिन्यांपासून असे प्रकार सुरू असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही बोलले जात आहे.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांनी संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांना रांगेत उभे करून जाब विचारावा आणि कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. जालन्यातील शासकीय रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना शिस्त लावण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सकांनी त्यांची 'क्लास' घ्यावी, अशी मागणीही सर्व स्तरातून पुढे येत आहे.

याबाबत शहरातील अनेक नागरिकांशी संवाद साधला असता त्यांनी सर्वप्रथम लोकप्रतिनिधींवर नाराजी व्यक्त केली. प्रशासनावर त्यांचा वचक राहिला नसल्याची भावना व्यक्त करत, काहींनी खासदारांबाबतही नाराजी व्यक्त केली. ''खासदार साहेब आता नावापुरतेच राहिले आहेत का? त्यांच्या बाबतीत पश्चाताप करण्याची वेळ येते की काय,'' असे मत काही सुज्ञ नागरिकांनी खाजगीमध्ये व्यक्त केले.

आता या प्रकरणावर जिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक तसेच खासदार आणि आमदार काय पावले उचलतात आणि कोणती कारवाई करतात, याकडे संपूर्ण शहरवासीयांचे लक्ष लागून आहे.

### डेमोसाठी नेलेले ट्रॅक्टर महिनाभर गायब

# जालना पोलिसांच्या खाक्यानंतर नऊ लाखांचे ट्रॅक्टर जप्त, आरोपी अटकेत

**जालना । प्रतिनिधी -** ट्रॅक्टर खरेदी करण्यापूर्वी ट्रायल घेण्याच्या बहाण्याने शोरूममधून ९ लाख रुपये किमतीचे नवीन कोरे ट्रॅक्टर पळवून नेणाऱ्या एका भामट्याला चंदनझिरा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. कलीम बेग सलीम बेग मिर्झा (रा. कस्तुरवाडी, ता. बदनापूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून पोलिसांनी सोनालीका कंपनीचे ट्रॅक्टर हस्तगत केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जालन्यातील चंदनझिरा परिसरात अर्जुन रमेश लोखंडे यांचे सोनालीका ट्रॅक्टरचे शोरूम आहे. १३ मार्च २०२६ रोजी आरोपी कलीम बेग हा शोरूमवर आला. ''मला ट्रॅक्टर खरेदी करायचे आहे, परंतु घेण्यापूर्वी एकदा शेतात ट्रायल करून पाहायचे आहे,'' असे सांगून त्याने शोरूम मालकाचा विश्वास संपादन केला. एका दिवसाच्या ट्रायलसाठी त्याने रीतसर करारनामा (ॲग्रीमेंट) करून दिला. या करारावर विश्वास ठेवून शोरूम मालकांनी त्याला डेमोसाठी नवीन ट्रॅक्टर दिले.

एक दिवसाची मुदत संपल्यानंतरही आरोपी ट्रॅक्टर घेऊन शोरूमवर परतला नाही. शोरूम मालकांनी त्याच्याशी संपर्क साधण्याचा वारंवार प्रयत्न केला, मात्र त्याचा फोन बंद येत होता. त्याचा ठावठिकाणा लागत नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे मालकांच्या लक्षात आले. अखेर याप्रकरणी दोन दिवसांपूर्वी चंदनझिरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी तात्काळ तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक रवी देशमाने यांना तपासाचे आदेश दिले. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपी कलीम बेग याचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेतले. सुरुवातीला त्याने पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे देऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी आपल्या खास शैलीत खाक्या दाखवताच त्याने गुन्हा कबूल केला आणि लपवून ठेवलेले ९ लाखांचे ट्रॅक्टर पोलिसांच्या स्वाधीन केले.

ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार, पोलीस उपनिरीक्षक रवि देशमाने, मारियो स्कॉट, पोलीस हेडकॉन्स्टेबल संदीप उगले आणि पोलीस अंमलदार गणेश नाईकवाडे यांच्या पथकाने पार पाडली.

व्यावसायिक व्यवहारात अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवताना सावधगिरी बाळगावी आणि अशा प्रकारच्या संशयास्पद हालचाली आढळल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन चंदनझिरा पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनी टेलिस्कोप सोलर फिल्टरने सूर्यदर्शन करून घेतला आनंद




**दत्ता देशमुख**

कै.बाबुराव जाफ्राबादकर माध्यमिक विद्यालय जालना येथे ''अस्ट्रोफाईल्स''यांच्या सहकार्याने 'सूर्य दर्शन कार्यशाळा' आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत विविध इयत्तांतील विद्यार्थ्यांनी सोलर फिल्टरचा वापर करून दुर्बिणीतून सूर्याचे निरीक्षण केले आणि सनस्पॉट्स तसेच सूर्याविषयीचे वैज्ञानिक ज्ञान आत्मसात केले. आजच्या काळात पारंपरिक शिक्षणातून अनुभवाधारित शिक्षणाकडे होत असलेल्या बदलाच्या पार्श्वभूमीवर अशा उपक्रमांची नितांत गरज आहे.

विद्यार्थ्यांना पृथ्वीवरील ऋतू हे पृथ्वीच्या अक्षाच्या झुकावावर अवलंबून असतात, तसेच सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने पृथ्वीवर दिवस हा रात्रीपेक्षा मोठा असतो, हे समजले.

सहकार्य केल्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका मुख्याध्यापिका श्रीमती.मीनाक्षी कुलकर्णी यांनी अमन सिंह सर मित पांचाळ सर,अभिषेक पांचाळ सर या मुंबईहून आलेल्या टीमचे स्वागत केले. यावेळी संदीप इंगोले, मदन सोजे, भीमाशंकर जवळेकर, राजाराम साबळे, प्रगती भालेकर, अलकनंदा गाडेकर, वंदना नन्नवरे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जालन्याच्या सुपुत्राची चंदेरी दुनियेत भरारी! सातेफळचा अमोल पाटोळे झळकणार मुख्य भूमिकेत

**दत्ता देशमुख**

**जाफराबाद -** तालुक्यातील जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर ग्रामीण भागातील तरुणही आकाशाला गवसणी घालू शकतात, याचाच प्रत्यय जाफ्राबाद तालुक्यातील सातेफळ येथील तरुण कलावंत अमोल छबुराव पाटोळे याने दिला आहे अतिशय खडतर परिस्थितीवर मात करत, आपल्या अंगभूत अभिनय कौशल्याच्या जोरावर अमोलने एका आगामी मराठी समाजप्रबोधनपर गीतात मुख्य भूमिका साकारली असून, त्याच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे

**दिग्गज कलाकारांची साथ**

या विशेष मराठी गीतामध्ये अमोल पाटोळे याला महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध अभिनेत्री चित्रा दीक्षित यांची साथ लाभली आहे हे दोघेही या गीतात मुख्य भूमिकेत दिसणार आहेत तांत्रिक बाजू भक्कम करण्यासाठी कोरिओग्राफर म्हणून सुनील कोरके आणि कॅमेरामन म्हणून राहुल निकम यांनी जबाबदारी सांभाळली आहे

या गाण्याच्या चित्रीकरणाचा शुभारंभ सामाजिक क्षेत्रातील नामवंत व्यक्तिमत्व, ॲड विलास साबळे (संस्थापक अध्यक्ष, मातंग युथ फेडरेशन, महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी त्यांनी अमोलच्या जिद्दीचे कौतुक करत ग्रामीण भागातील कलावंतांना अशाच व्यासपीठाची गरज असल्याचे प्रतिपादन केले

**स्थानिक कलावंतांचा मेळा**



विशेष म्हणजे या प्रकल्पामध्ये स्थानिक कलागुणांना वाव देण्यात आला आहे यामध्ये सहकलाकार म्हणून खालील कलावंतांनी आपली भूमिका चोख बजावली आहे:

संदीप पाटोळे, प्रदीप पाटोळे, अजय खंदारे, प्रशांत पाटील, प्रतीक खंदारे, विशाल फंटे, तुषार खंदारे, लक्ष्मी खंदारे, निशा अंभोरे आणि श्रुती तांबे. ''परिस्थिती कितीही कठीण असली तरी कला आणि कष्टाची साथ सोडली नाही, तर यश नक्की मिळते सातेफळसारख्या छोट्या गावातून इथपर्यंतचा प्रवास आव्हानात्मक होता, पण सर्वांच्या सहकार्यामुळे हे शक्य झाले'' असे अमोल छबुराव पाटोळे यांनी म्हटले. ग्रामीण भागातून अभिनय क्षेत्रात नावलौकिक मिळवणाऱ्या अमोल पाटोळेचे हे पाऊल भविष्यात अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे

# संध्यास्त इंद्रधनू;संध्यामग्न विरक्तीची वृतस्थ कविता - डॉ प्रभाकर शेळके

**दत्ता देशमुख**

कवि गोविंद वायाळ मु.पो.वायाळ पांगरी बु.ता मंठा. जि.जालना. पुणे स्थित.''नियतीनं अवेळीच हंगाम खुडून नेला की उरते केवळ जगण्याची उनगवाडी अन् दुःख गर्भाशीण होतं.मग,फक्त दिवस जातात.दिवस सरत ही नाही आणि भरतही नाही''(पृष्ठ ७३) ही ओळ मनपिळवटून

टाकते. तिथं खरी कविता जन्म घेते. कवी शब्द श्वासा गणिक कविता होऊन जगतो.त्याचं नितळ मनफुलपाखरू होऊन उडत राहतं आठवांच्या फांदीवर.शब्द थव्यांच्या कविता होऊन जातात. क्षणोक्षणी वैरानं माळरानी.कवी उदास होऊन डोळ्यांच्या कडा ओलावत लावितं राहतो मनाच्या तेलवाती.कवितेची अर्पणपत्रिका ''संध्या,तू खानदानी जन्मजात निर्मोही..तरी,वृंदावनीच्या तुळशी मंजिरींचा सुंगध गेलीस सोबत घेऊन जपम्हणून माझ्या तळहाती सांजवातीचा तेलदिवा ठेवून..! गुरुवर्यांचा चरणस्पर्श घेत हा शब्द घनव्याकुळ होऊन अर्पण करतो.

संध्यास्त इंद्रधनू, गुरुच्या चरणी. उराशी कवटाळून गहिवरल्या भावनेनं गळाभेट घेतं गुरू आशीर्वाद देतात.

आई बाबांच्या चरणी नतमस्तक होतं.पुण्याईने दुर्दम्य इच्छाशक्तीने चांगला माणूस झाल्याची ग्वाही अन् आई बापाचं स्वप्न श्रीमंत करतो.हा अद्वैत अदम्य् इच्छेचा निर्लेप नितळ श्रध्देय रूप कवीचे दिसून येते.कवी गोविंद वायाळ हे एक निस्सीम श्रद्धेय ज्ञानभक्तीचे प्रतिक आहेत.आम्ही कवितेचं देणं लागतो.या नितळ भावनेतून रक्तवाहिनीची कविता होऊन होऊन जगणं म्हणजे काय असते?श्रध्देय गुरू प्रा.जयराम खेडकर कवितेचा मर्मग्राही आस्वादक स्वानंद कवितेविषयी लिहितात''नुसती शब्दांची शृंखला नसते कविता,ओले काळीज जाळणारी ती आग असते.''काट्यांची कुरूप होऊन दुःख देहभर सलते तेव्हा खरी कविता येते.कविता असते आत्म्याचा शब्द,संचित जीवनाअनुभवाच्या दुःखाचा घनव्याकुळ उद्गार असते कविता. सर्वात चांगली कविता लिहिणारा कवी त्या क्षणी सर्वात चांगला माणूस असतो.केवळ शब्द आणि



अर्थ याची कविता होत नाही,तर ती असते सर्वांग सुंदर स्वप्न, सर्वांत चांगल्या माणसाच्या इच्छाशक्तीचं!..या शृखलेत गोविंद वायाळ यांचं अढळ स्थान आहे.संत तुकोबांच्या भूमिकांत वंशपरंपरेचा कवि म्हणून वाचक रसिकांना नोंद घ्यावी लागेल, कारण अनुभवांचा शब्दोच्चार म्हणून ही. कविता प्रकट होते(शुभेच्छापर) ही संध्यामग्न पुरुषांची लक्षणे. सृजनशील स्नेहाळू भावनेचा ओलावा या काव्यातून दिसून येतो. रानशिवारातला एक अनामिक नितळ निर्झर वाहत राहावा इतक्या तरलतेने ही कविता संध्यामग्न होऊन वाहते आहे.कवि अंतःकरण इतके आर्त

झाले आहे की, कवितेची सृजन ओळ खोलवर ओल देऊन जाते. जसे''स्वप्नात तिच्या आला,एक शब्दवेडा सांगत राहिला तिला रंग दिवान्या कहाण्या/सकाळी तिच्या भोवती होता चंद्रचुरा सांडलेला (पृष्ठ ०१)ही अलवार कोवळी मनमुग्ध मनाची ओळ कविच्या मनाची अंभगीत लयताल आहे.पुढे चिंब पावसात भिजताना, माझ्या स्पर्शातील किरण,मी माझा असतो तेव्हा तुझाचं असतो,शिरस्त्याचे बंध झुगारून, स्वप्नातील ओल काळीजभर होते, स्पर्श व्हावा असा की,या कवितेमधून एक निस्सीम सृजनशील भावकविता आपल्या सखीच्या पैंजणी ध्वनीची एक लय घेऊन येते.देहाच्या अंतरगी सखीला आपल्या मनाच गोडगुलाबी गुपीत मनाच्या कुपीत आतरदानी गत जपावं इतकं निष्ठावंत भूमीनिष्ठ भाग्यवंत होऊन ही कविता संयत तरलतेने येते.जसे

''स्पर्श व्हावा असा की,
निखळून पडावे बंध सारे
पापुद्रे निघावेत काळजाचे
उकलत जावे सारे पदर
अन्
उन्मळून पडावे मुळासकट
कुण्या गंधार्त स्मृतीत''....(पृष्ठ ०७) काव्य हे मनातून खोलवर झिरपत राहते.तिच्या आठवणीचा नितळ झरा वाहत राहतो.कवि मन एक नितांत निवांत मनातून अशांत पाखरू होऊन फक्त ध्यानमग्न अवस्थेत एखाद्या ओढ्याच्या काठावर फक्त तिच्या अमोघ वाणीचा एखादा स्वर कानावर येईल.तीने तिचं अहेव लेणं मिळवलं.तो एक अनामिक ओढीनं फक्त तिची वाट पाहतो आहे. तिने सारं सर्वस्व अर्पण केलं.ती आहुती म्हणून त्याच्या चरणाशी लिनं झाली.तो तिच्या मोहात अजूनही फक्त सुगंध होऊन तिच्या चाहुलीनं तो चावळला आहे.हा साक्षात परमानंद मनाचा हुंकार देत तिच्या मोहाची कविता होऊन जगतो आहे.''निळ्या नवलाईतील नितळ लेणं, दुःख वाटून घेता येतं, राजबिंड्या वैभवाला बिलगली हिरवाई,राजवर्खी रूपाला नक्षत्राचा जर,रंग उधळले असे तू फुललो, बहरलो,मोहरलो, तुझ्या निर्देही असण्यातील रंग''

ही कविता इतकी तलम रेशमी बंधाची आहे.वाऱ्यावरती हळूवार स्पर्शून सारी स्वप्न फुले आभाळभर व्हावीत अन् या आभाळरंगात युगानुयुगाचा प्रेमानूबंधाचा ढगांनी सप्तरंग काढावेत इंद्रधनूचे इतकी अनामिक ओढीची ही प्रेमळ कविता जसे''तुझ्या निर्देही असण्यातील रंग

माझ्या सदेही/जगण्यात उतरले

असे की,

इंद्रधनू उमटले अस्मानी माझ्या..

(पृष्ठ १३)

कवीवर्य गोविंद वायाळ जी यांच्या शब्दकळेने एक आर्त हाक जी केवळ कवितेचा मर्मग्राही अनुबंध होऊन जाते.

प्रस्तावनेत डॉ रणधीर शिंदे लिहितात ''गोविंद वायाळ यांची कविता हे एक व्याकुळ प्रीत स्मृती काव्य आहे.ती रूप संपन्न आणि रुप सुंदर आहे.तसेचं ती कोणती देहाची आहे.गौरंगी कांतीची ती चंद्रवेलीरूपी आहे.तिच्या आठवणी सालस आहेत.ती अखंड आणि अमर्यादित आहे.तिचे वैदेही बंध त्याला प्रकाश मान करणारे आहेत.या प्रेमकथेतील ती हळदीवी आहे..मात्र धुंद अशी ही अंभग प्रेमकहाणी मध्येचं दुभंगते.. (प्रस्तावना)कळी काळाच्या निखळ कच्चखापी दगडी वाड्याचे अवशेष भूईकंपीत व्हावे आणि मनाने एक हळवे फुलपाखरू होऊन शोधावेत आठवांचे क्षणक्षणीचे मन मुक्त श्वास..

''दुःखाचे प्रपाती उन्माद/निरंतर
कोसळतात तेव्हा
कातळ केले स्वतःला तरी/
काळजावर प्रस्तर प्रहार
अखंड होत असतात.
सरणफुलांचे तारे होतात/अन्
चंद्रच काळवंडतात''

(पृष्ठ.५२)ही उध्वस्त स्वप्न प्रदेशातील कविता मनाचे विवर व घनघोर अंधार शब्द पाकळ्या ही कविता देऊन जाते.

कवी गोविंद वायाळ यांची कविता निसर्ग प्रतिमा प्रतिकातून व्यक्त होताना ती ओंजळभर सुखाचा स्वानंद देते की,प्रेम ही एक मानवी मनाची भावस्पर्शी स्पंदनाची बोली होऊन जेव्हा येते तेव्हा ती जणू क्षितीजभर आपले रंग उधळत असते.हाच कवीस्नेह धागा हा अथांग होऊन जातो हे या कवितेचे श्रेयस आहे.बर्लब(पाठराखण) प्रा प्रतिभा सराफ लिहितात ''कवी गोविंद संध्यास्त इंद्रधनू या अप्रतिम शीर्षकाचा कवितासंग्रह. आपण केवळ कल्पना करतो. परंतू आपली कल्पना कवितेतून सत्यात उतरलेली पाहतो तेव्हा आश्चर्यचकित होतो.निसर्गाच्या भव्य पटलावरच्या सप्तरंगात या कविता आपल्याला वास्तवात प्रेमानुभवाने भिजवून टाकतात. प्रेयसीच्या भेटीची ओढ,तिची प्रत्यक्ष भेट, तिच्या तनाचा मनातून वेध आहे. या सर्व कवितांत वापरलेल्या उपमा अलंकार, प्रतिमा,प्रतीकं, लाजवाब आहेत. हुळहुळती लाज, स्पंदनातील ओल,कंचनी देह, राजवर्खी रुप,गौरगी कांती, कातळकोरीव शिल्प,इ.उदा देते (प्रतिभा सराफ, मुंबई) कवीवर्य गोविंद वायाळ यांच्या सृजनशील भावनेचा आदर आहेच. अतिशय आशय संपन्न कविता आली आहे.

मुखपृष्ठ डॉ गिरीश चरवड, पुणे यांचे आहेत.प्रा जयराम खेडेकर सरांनी हा अप्रतिम कवितासंग्रह साक्षात देखणा केला आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.